नि.दि.दावा क्र.६८१/२०२१

नि.क्र.४३

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.३ चा जबाब शपथेवर पुढीलप्रमाणे**

साक्षीदारचे नाव – जग्गनाथ भगवानराव सुरवसे,

वय– ६० वर्षे , व्यवसाय–शेती

पत्ता– रा.तळेगाव बोरी,ता.शिरुर अनंतपाळ,जि.लातूर

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपास अॅड.जी.आर.साळुंखे यांचे मार्फत शपथेवर सुरु–**

१. मला न्यायालयाचे साक्षीसमन्स मिळाले. मी अविनाश कमलापुरे, जग्गनाथ कमलापुरे यांना ओळखतो. मी शिवनंदा हाके आणि अंजनाबाई कमलापुरे यांना ओळखतो. अविनाश आणि जग्गनाथ यांच्यामधील खरेदीपत्र दाखवल्यास मी ओळखू शकतो. (आता मला निशाणी ३८ वरील खरेदीपत्राची दुय्यम प्रत दाखवण्यात आली.) ते खरेदीपत्र शिवनंदा हीच्या लग्नाच्या खर्चासाठी केले होते. खरेदीपत्रावेळी शिवनंदा हिचे वय १९ वर्षे होते असे खरेदीपत्रामध्ये नमुद आहे.

**वादीतर्फे साक्षीदार क्र.३ चा उलटतपास अॅड. एम.के.वलांडे यांचे मार्फत शपथेवर सुरु–**

२. प्रतिवादी क्र.१ जग्गनाथ कमलापुरे यांना शेतीशिवाय उत्पन्नाचे अनय् साधन नाही. मला जग्गनाथ कमलापुरे यांच्या दि.१८.०३.२००८ रोजीच्या खरेदीच्या व्यवहारांशिवाय अन्य व्यवहारांची माहिती नाही. जग्गनाथ याला दोन मुली आणि एक मुलगा आहे. जग्गनाथच्या कुटूंबामध्ये वाटण्या झालेल्या नाहीत. शिवनंदा ही दि.१८.०३.२०१८ रोजी सज्ञान होती असा पुरावा खरेदीपत्रावेळी दाखवला नव्हता. शिवनंदा तेव्हा कोणत्या वर्गात शिकत होती हे मला सांगता येत नाही. वादी व प्रतिवादी क्र.३ यांचे लग्न केव्हा झाले हे मला सांगता येत नाही. वादीचे लग्न अंदाजे सन २००८ मध्ये झाले. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या हिश्श्याची जमीन वादीच्या लग्नाकरीता विक्री करत आहे असे निशाणी ३८ वरील खरेदीपत्रामध्ये कोठेही नमूद नाही. मी

प्रतिवादी क्र.१ चा मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ माझा मित्र असल्याने त्याला मदत होण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.** **श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.**

**फेर तपास नाही.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.05.10 10:57:27 +0530

निलंगा (**श्रीमती. ए.एस.गुंजवटे**)

दि.०८/०५/२०२५ २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, निलंगा.